**आकाशवाणी नागपूर,**

**प्रादेशिक वृत्त विभाग**

**प्रादेशिक बातम्या (मराठी-वेळ सायंकाळी ०६.००)**

**सोमवार दिनांक २० एप्रिल २०२६**

**ठळक बातम्या**

1. **संभाव्य अल निनोच्या पार्श्वभूमीवर उपलब्ध पाण्याचे नियोजन आणि जलसंधारणाची कामे पूर्ण करण्यावर भर देण्याचे मुख्यमंत्र्यांचे निर्देश.**
2. **महिला आरक्षणासाठी आवश्यक असणाऱ्या १३१ व्या घटनादुरूस्ती विधेयकाच्या बाजूने जनमत वळवण्यासाठी भाजपची देशभरात मोहीम.**
3. **महिला आरक्षणाच्या नावाखाली भाजपचा मतदारसंघ पुनर्रचना विधेयक मंजूर करण्याचा डाव फसल्याचा काँग्रेस खासदार प्रणिती शिंदे यांचा आरोप.**
4. **विदर्भात आज संमिश्र वातावरण; उष्णतेच्या लाटेसह वादळी पर्जन्यमानाचा इशारा.**

---

जलसंधारण/मुख्यमंत्री

संभाव्य एल निनोच्या पार्श्वभूमीवर राज्यात पूर्वतयारी वाढवण्याचे निर्देश मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी दिले आहेत. त्यांच्या अध्यक्षतेखाली झालेल्या उच्चस्तरीय बैठकीत पाणी नियोजन, जलसंधारण आणि जुन्या जलस्त्रोतांच्या पुनरुज्जीवनावर भर देण्याचं सांगण्यात आलं. भारतीय हवामानशास्त्र विभागाने दिलेल्या माहितीनुसार, ऑगस्ट-सप्टेंबरमध्ये एल निनोचा प्रभाव वाढून पावसात घट होण्याची शक्यता आहे. उष्णतामानातही वाढ होऊ शकते, असा अंदाज व्यक्त करण्यात आला. या पार्श्वभूमीवर मुख्यमंत्र्यांनी जलयुक्त शिवार आणि गाळमुक्त धरण-गाळयुक्त शिवार योजना तातडीने राबवण्याचे निर्देश दिले. पाणी साठवण क्षमता वाढवून कमी पावसाच्या परिस्थितीत शेतीचे नुकसान कमी करण्यावर या बैठकीत भर देण्यात आला. प्रत्येक जिल्हयात पाणी बचतीसाठी टास्क फोर्स स्थापन करून काटेकोर नियोजन करण्यास सांगण्यात आलं. तसेच मनरेगा अंतर्गत जलसंधारणाच्या कामांना प्राधान्य देण्याचे निर्देश देण्यात आले. पशुधनासाठी चारा टंचाई टाळण्यासाठी राज्यातच वैरण विकास कार्यक्रम राबवण्याचेही आदेश देण्यात आले. कृषिमंत्री दत्तात्रय भरणे यांनी खत आणि बियाण्यांचा पुरवठा सुरळीत ठेवण्यासह शेततळे योजनेवर भर देण्याचं सांगितले. खरीप हंगामात नुकसान टाळण्यासाठी कृषी विभाग

सज्ज असून आवश्यक उपाययोजना तातडीने राबवण्यात येत असल्याचंही त्यांनी स्पष्ट केलं.

---------------------------------------

मुख्यमंत्री पत्रकार परिषद

महिला आरक्षणासाठी आवश्यक असणारं, १३१ वी घटनादुरूस्ती विधेयक संसदेत नामंजूर झाल्यानंतर विधेयकाच्या बाजूनं जनमत वळवण्यासाठी भाजपानं देशभरात मोहीम हाती घेतली आहे. महिला आरक्षण विधेयक मंजूर न होऊ दिल्याचे परिणाम विरोधी पक्षांना भोगावे लागतील, असा इशारा संसदीय कार्यमंत्री किरेन रिजिजू यांनी दिला आहे. महिला आरक्षणासाठी जनमताचा रेटा वाढवण्यासाठी महायुतीतल्या तिन्ही पक्षांकडून मोहीम राबवण्यात येणार असल्याची घोषणा मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी केली. ते आज मुंबईत वार्ताहर परिषदेत बोलत होते. यासाठी राज्यात एक कोटी महिलांच्या सह्या गोळा करण्यासह तालुकास्तरापर्यंत जनजागृती करणार असल्याचं त्यांनी सांगितलं. २०२९ पासून महिला आरक्षण लागू करण्यासाठी परिसीमन विधेयक पारित होणं गरजेचं असल्याचं मत फडणवीस यांनी यावेळी मांडलं.

***(होल्ड बाईट - मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस - ४० सेकंद)***

लोकसभा मतदारसंघाच्या पुनर्रचनेत सर्व राज्यांच्या जागा ५० टक्के वाढणार आहेत, असं ते म्हणाले. महिला आरक्षणाला विरोध करून काँग्रेससह शरद पवारांची राष्ट्रवादी आणि शिवसेना उद्धव बाळासाहेब ठाकरे पक्षाचा महिला विरोधी चेहरा उघड झाल्याचं मुख्यमंत्री म्हणाले. यावेळी विधानपरिषदेच्या उपसभापती नीलम गोऱ्हे, महिला आणि बालविकास मंत्री आदिती तटकरे, मुंबईच्या महापौर रितू तावडे उपस्थित होत्या.

---------------------------------------

प्रणिती शिंदे

महिला आरक्षणाच्या नावाखाली भाजपने संसदेचं विशेष अधिवेशन बोलावलं पण अधिवेशनाच्या कार्यक्रम पत्रिकेत त्याचा उल्लेखही नव्हता. महिला आरक्षणाच्या नावाखाली भाजपला मतदारसंघ पुनर्रचना विधेयक मंजूर करायचं होतं, पण त्यांचा कुटील डाव काँग्रेससह सर्व विरोधकांनी हाणून पाडला असून सरकार पूर्णपणे बॅकफूटवर गेले आहे, असा आरोप काँग्रेस खासदार  प्रणिती शिंदे यांनी केला. सोबतच मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी दिलेल्या खुल्या चर्चेला काँग्रेस तयार असल्याचंही त्यांनी स्पष्ट केलं. टिळक भवन इथं  झालेल्या विशेष पत्रकार परिषदेला काँग्रेस वर्किंग कमिटीच्या

सदस्य खासदार प्रणिती शिंदे आणि खासदार शोभा बच्छाव यांनी संबोधित केलं. २०२३ मध्येच महिला आरक्षण विधेयक सर्वसंमतीने पास झालं आहे. पण भाजप सरकारने त्यात जनगणना आणि  मतदार संघ पुनर्रचनेच्या दोन अटी टाकल्या होत्या, या अटी न ठेवता सध्या लोकसभेच्या असलेल्या ५४३ जागांमधूनच ३३ टक्के आरक्षण द्यावे, अशी काँग्रेसने मागणी केली होती पण भाजपने त्याकडे दुर्लक्ष केलं असा आरोपही शिंदे यांनी यावेळी केला.

---------------------------------------

महसूलमंत्री बावनकुळे

राज्यात संभाव्य दुष्काळजन्य परिस्थिती लक्षात घेऊन शासनाने व्यापक उपाययोजना आखण्यास सुरुवात केली असून संपूर्ण प्रशासन सतर्क ठेवण्याचे निर्देश देण्यात आले आहेत, अशी माहिती नागपूर आणि अमरावती जिल्ह्याचे पालकमंत्री तथा महसूलमंत्री चंद्रशेखर बावनकुळे यांनी आज प्रसारमाध्यमांना दिली.  महिला आरक्षणाच्या मुद्द्यावर बोलताना बावनकुळे यांनी काँग्रेसवर जोरदार टीका केली. "लाडक्या बहिणींचा विश्वासघात काँग्रेसने केला असून या वृत्तीचा जनता बदला घेईल," असं  ते म्हणाले.

---------------------------------------

सर्वोच्च न्यायालय

निवडणुकीपूर्वी, राजकीय पक्षांकडून केल्या जाणाऱ्या मोफत योजनांच्या घोषणांसंदर्भात सर्वोच्च न्यायालयानं केंद्र सरकार, निवडणूक आयोग तसंच भारताचे नियंत्रक आणि महालेखापरीक्षक यांना नोटीस बजावली आहे. अशा मोफत योजनांच्या घोषणा करायला बंदी घालण्याची मागणी करणाऱ्या एका जनहित याचिकेवर सरन्यायाधीश न्यायमूर्ती सूर्यकांत आणि न्यायमूर्ती जॉयमाल्य बागची यांच्या खंडपीठानं ही नोटीस बजावली. हा मुद्दा उपस्थित करणाऱ्या प्रलंबित याचिकांसोबत ही याचिका सुनावणीसाठी जोडली जाईल, असं न्यायालयानं सांगितलं. राजकीय पक्षांनी त्यांच्या आश्वासनांचे आर्थिक परिणाम विवरणपत्राद्वारे जाहीर करावेत, अशी मागणी करण्याचे निर्देश निवडणूक आयोगाला द्यावेत, अशी मागणी या याचिकेत केली आहे. अशा नियमांचे पालन न करणाऱ्या पक्षांवर कारवाई करण्याचे निर्देश निवडणूक आयोगाला द्यावेत, अशी मागणीही त्यात केली आहे.

---------------------------------------

मुली विक्री व धर्मांतरण

यवतमाळच्या राळेगाव, कळंब, केळापूर तालुक्यात हिंदू मुलींच्या विक्री आणि त्यांच्या धर्मांतरणाचा दावा भाजप जिल्हाध्यक्ष प्रफुल्ल चौहान यांनी केला होता. या प्रकरणात पोलीस अधीक्षक कुमार चिंता यांनी स्पष्टीकरण दिलं असून यात धर्मांतरणाची कुठलीही माहिती पुढे आली नसल्याचं त्यांनी सांगितलं. 2025 मध्ये 38 मुली गायब होत्या, त्यात 37 मुली सापडल्या आहेत असे जिल्हा पोलीस अधीक्षक कुमार चिंता यांनी सांगितले. यात धर्मांतरण झाल्याची तक्रार नसल्याचंही ते म्हणाले.

---------------------------------------

मंत्री पंकज भोयर

जिल्ह्यातील अनेक युवा शेतकरी आपल्या शेतात नवनवीन प्रयोग करत आहे. या शेतकऱ्यांना योग्य मार्गदर्शनासोबतच आवश्यक सुविधा निर्माण करून दिल्यास हे शेतकरी जिल्ह्यात चांगला बदल घडवून आणू शकतात. त्यामुळे त्यांना आवश्यक सुविधा पुरविण्यावर भर द्या, असे निर्देश वर्धा जिल्ह्याचे पालकमंत्री डॉ.पंकज भोयर यांनी दिले. जिल्हाधिकारी कार्यालयाच्या सभागृहात पालकमंत्र्यांनी युवा शेतकऱ्यांसोबत संवाद साधला. त्यांच्या अडचणी आणि अपेक्षित आवश्यक सुविधांची माहिती घेतली.

---------------------------------------

शिकार टोळी जेरबंद

गडचिरोली जिल्ह्यात आज आलापल्ली वनपरिक्षेत्रातील जंगलातून दुर्मिळ पक्ष्यांची शिकार करणाऱ्या टोळीला वनाधिकाऱ्यांनी जेरबंद केलं. आतापर्यंत १२ शिकाऱ्यांना अटक करण्यात आली असून, त्यांच्याकडून राज्य पक्षी शेकरु, उडणारी खार, घुबड यासह अन्य पक्षी आणि त्यांचे अवयवही ताब्यात घेण्यात आले आहेत. काल संध्याकाळी काही जण शिकारीसाठी जंगलात लपून बसल्याची माहिती मिळाल्यानंतर या १२ जणांना रात्री उशिरा अटक करून भारतीय वन अधिनियम १९२७ तसेच वन्यजीव संरक्षण अधिनियम १९७२ अन्वये गुन्हा दाखल करण्यात आला आहे.

---------------------------------------

हवामान

विदर्भात आज संमिश्र हवामान बघायला मिळत असून एकीकडे अमरावती, अकोला आणि वर्धा जिल्ह्यात उष्णतेच्या लाटेचा येलो अलर्ट जारी केलेला असतानाच याच जिल्ह्यांसह बुलढाणा, वाशिम, यवतमाळ आणि चंद्रपूर इथं विजांच्या कडकडाटासह वादळाची शक्यता प्रादेशिक हवामान विभागानं वर्तवली आहे. आज सकाळपासून अधून मधून नागपुरात

देखील ढगाळ वातावरण आहे. उद्या देखील नागपूर सह चंद्रपूर, गडचिरोली, वर्धा, यवतमाळ आणि अमरावती या जिल्ह्यांमध्ये संमिश्र वातावरण राहण्याची शक्यता आहे. दरम्यान आज अकोला इथं आज ४३ पूर्णांक २ दशांश अंश इतकं कमाल तापमान नोंदविण्यात आलं तर नागपुरात ४१ पूर्णांक २ दशांश अंश सेल्सिअस इतकं शुष्क तापमान नोंदविण्यात आलं.

---------------------------------------